।।शीलं परम् भूषणम् ।।

राष्ट्रीय शिक्षण संस्था लाखनी द्वारा संचालित

हीरक महोत्सवी वर्ष २०२४-२५

# समर्थ महाविद्यालय, लाखनी




# समर्थ वार्ता

## ई-त्रैमासिक

ऑक्टोबर ते डिसेंबर २०२४



समर्थ वार्ता

ई-त्रैमासिक

# संपादक मंडळ



## डॉ.दिगांबर कापसे

**प्राचार्य**

**समर्थ महाविद्यालय, लाखनी**


प्रा.अजिंक्य भांडारकर


डॉ.संगीता हाडगे


डॉ.संदिपकुमार सरैया


प्रा.मिलिंद कांबळे


प्रा.रुपाली खेडीकर


प्रा.युवराज जांभुळकर


प्रा.मनिषा मदनकर

## प्राचार्य कक्षातून.....

समर्थ ई—त्रैमासिकाच्या निमित्ताने..

प्रिय विद्यार्थी, पालकवर्ग, प्राध्यापकगण व समाजातील मान्यवर, तसेच महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी, आपल्या महाविद्यालयाच्या वतीने नव्याने सुरू असणाऱ्या ''समर्थ ई—वार्तापत्र'' या त्रैमासिकाच्या दुसऱ्या अंकाचे दालन आपल्यासमोर खुले करताना मनात विशेष आनंद आणि समाधानाचे भाव दाटून आले आहेत.


समाजमाध्यमे व तंत्रज्ञानाच्या सध्याच्या युगात संवादाची नवी क्षितिजे खुली होत आहेत. त्या अनुषंगाने महाविद्यालयाने २०२४—२५ या शैक्षणिक वर्षापासून ''समर्थ ई—वार्तापत्र'' या डिजिटल त्रैमासिकाची सुरुवात केली आहे. या वार्तापत्रामध्ये महाविद्यालयात राबविण्यात येणारे विविध उपक्रम, विद्यार्थ्यांच्या सर्जनशील योगदानाचे संकलन तसेच आजूबाजूच्या घडामोडींवर आधारित लेख व अभ्यासपूर्ण माहिती समाविष्ट असते.

या त्रैमासिकाचे वैशिष्टय म्हणजे त्याचा डिजिटल माध्यमातून प्रसार ज्यामुळे महाविद्यालयाच्या उपक्रमांची माहिती सहज व सुलभतेने विद्यार्थ्यांपासून ते समाजाच्या विविध स्तरांपर्यंत पोहोचविता येते. या उपक्रमामुळे महाविद्यालयाच्या नेतृत्व क्षमतेचा प्रत्यय येईलच, परंतु त्याचबरोबर शिक्षणाच्या क्षेत्रात आमचा ठसा अधिक ठळकपणे उमटेल.

सन २०२४—२५ हे वर्ष 'समर्थ महाविद्यालयाचा हीरक महोत्सवी वर्ष' आहे. त्यामुळे या ई—वार्तापत्राची सुरुवात ही खरं तर दुग्धशर्करा योग म्हणावा लागेल. यापूर्वी घेतलेल्या उपक्रमांना प्रसारमाध्यमांनी दिलेला भरभरून प्रतिसाद आणि प्रसिद्धी, हे महाविद्यालयासाठी गौरवाचेच द्योतक ठरले आहे. हे त्रैमासिक केवळ वर्तमानापुरते मर्यादित न राहता, भावी पिढ्यांसाठी प्रेरणादायी आणि मार्गदर्शक दस्तावेज ठरेल, अशी आमची भावना आहे. आम्ही आमच्या उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधत असतो. त्याचबरोबर त्यांच्या सर्जनशील विचारांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे, ही आमची जबाबदारी समजतो. हे ई—त्रैमासिक त्याचे एक सशक्त माध्यम ठरेल, यात शंका नाही.

आपण या दुसऱ्या अंकाचे हार्दिक स्वागत कराल, त्यातील माहितीचा लाभ घ्याल आणि महाविद्यालयाच्या कार्याला आपला अमूल्य पाठिंबा व प्रोत्साहन लाभेल, अशी अपेक्षा आहे.

आपला,
डॉ. दिगांबर कापसे
प्राचार्य, समर्थ महाविद्यालय, लाखनी



## २ ऑक्टोंबर 'महात्मा गांधी जयंती'

दिनांक २ ऑक्टोंबर २०२४ रोजी महात्मा गांधी जयंती निमित्त सकाळी १०.०० ते ११.०० वाजेपर्यंत लाखनी नगर व परिसरातील गावांमध्ये एनएसएस व एनसीसी कॅडेट्सने स्वच्छता अभियान राबविण्यात आले.


















## 'स्वच्छमेव जयते' अभियान

स्थानिक राष्ट्रीय शिक्षण संस्था द्वारा संचालित समर्थ महाविद्यालय, लाखनीतर्फे सामाजिक जबाबदारीचे भान ठेवून आणि गांधी जयंतीच्या निमित्ताने 'स्वच्छता ही सेवा' अंतर्गत 'स्वच्छमेव जयते' या विशेष स्वच्छता अभियानाचे आयोजन करण्यात आले आहे. २ ऑक्टोबर २०२४ रोजी हा व्यापक स्वच्छता उपक्रम लाखनी तालुक्यातील २५ गावांमध्ये एकाच वेळी राबविले गेले. या अभियानाचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे ग्रामस्वच्छता व सामाजिक जागरूकता वाढविणे असून, हे अभियान प्राचार्य डॉ. दिगांबर कापसे यांच्या नेतृत्वात आणि मार्गदर्शनात राबविले गेले.

महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना (NSS) विभाग, राष्ट्रीय छात्र सेना (NCC) आणि सांस्कृतिक विभागातील विद्यार्थी तसेच प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी या अभियानात सक्रिय सहभाग नोंदविला. विशेष म्हणजे, ग्रामपंचायत प्रमुख, सरपंच आणि गावकरी यांना या उपक्रमात सहभागी होते. महाविद्यालय आणि गाव यांच्यातील संयुक्त सहकार्यामुळे या उपक्रमाला व्यापक स्वरूप मिळेल आणि स्वच्छता अभियान यशस्वीरीत्या राबविले गेले.












## 'स्वच्छमेव जयते' अभियान

या स्वच्छता अभियानाची जबाबदारी राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रमुख प्रा. धनंजय गिऱ्हेपुजे आणि राष्ट्रीय छात्र सेनेचे कॅप्टन बाळकृष्ण रामटेके यांच्यावर देण्यात आली होती. प्राचार्य डॉ.दिगांबर कापसे यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयातील विद्यार्थी आणि कर्मचारीवर्ग गावांमध्ये जाऊन स्वच्छता मोहीम राबविली.. या अभियानात प्रत्येक गावात ग्रामपंचायतींना साथ मिळणार असून, गावकऱ्यांनी देखील यात सक्रिय सहभाग नोंदविला, लाखनी तालुक्यातील २५ गावांमध्ये महात्मा गांधी जयंतीच्या निमित्ताने व्यापक स्वच्छता अभियान राबविला. यात लाखनी नगरपंचायत परिसर तसेच सावरी, मुरमाडी, सोमलवाडा, खेडेपार, गोंडसावरी, गडेगाव, केसलवाडा/ वाघ, रेंगेपार कोहळी, पिंपळगाव, मानेगाव, पोहरा, रेंगेपार कोठा, लाखोरी, सेलोटी इत्यादी गावांचा समावेश होता. या सर्व गावांमध्ये ग्रामपंचायत सदस्य, स्थानिक नागरिक, युवक, आणि स्वयंसेवक एकत्रित येऊन स्वच्छतेचे विविध उपक्रम राबवतील. प्रत्येक गावात, रस्ते, सार्वजनिक ठिकाणे, मंदिर परिसर, शाळा, आणि इतर ठिकाणी स्वच्छता अभियान प्रभावीपणे पार पडले. या अभियानाच्या यशस्वीतेसाठी सर्व आजी–माजी विद्यार्थी, महाविद्यालयीन कर्मचारी आणि सामाजिक जबाबदारी असलेल्या नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी झाले. 'स्वच्छता ही सेवा' या संकल्पनेला साकार रूप देण्यासाठी आणि स्वच्छ व सुंदर भारत निर्माण करण्याच्या दिशेने हे अभियान महत्त्वपूर्ण पाऊल ठरले.



## ‘स्वच्छमेव जयते’ अभियान

### समर्थ महाविद्यालयातर्फे २५ गावांत ‘स्वच्छमेव जयते’ अभियान आज ग्रामस्वच्छता व सामाजिक जागरूकता वाढविण्याचा उद्देश

















## 'स्वच्छमेव जयते' अभियान

समर्थ महाविद्यालयाच्या या उपक्रमामुळे तालुक्यात स्वच्छतेबाबत जनजागृती वाढली. आणि सामाजिक जबाबदारीची भावना वृद्धिंगत झाली. महात्मा गांधींनी दिलेला स्वच्छतेचा संदेश ग्रामीण भागात पोहोचविणे आणि गावकऱ्यांना स्वच्छता व आरोग्याच्या दृष्टीने अधिक सजग बनवणे, हा या उपक्रमाचा मुख्य हेतू होता. अभियानाच्या यशस्वीतेनंतर, या योजनेचा अहवाल भारत सरकारकडे पाठविण्यात आला. अन्य गावांसाठी देखील प्रेरणादायी ठरला. समाजसेवा, स्वच्छता आणि राष्ट्र उभारणीच्या दृष्टीने समर्थ महाविद्यालयाने राबविलेला हा उपक्रम एक महत्वपूर्ण पाऊल ठरले आहे, असे मत तालुक्यातील नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे.



## ‘अर्चना वार्षिकांकाचे थाटात प्रकाशन’

समर्थ महाविद्यालय, लाखनी येथे ‘अर्चना वार्षिकांक प्रकाशन सोहळा गांधी जयंती कार्यक्रमाची औचित्य साधून ३ ऑक्टोबर २०२४ रोजी डॉ. गुरुप्रसाद पाखमोडे, ॲड. मनीष कापगते, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिगांबर कापसे यांच्या प्रमुख हस्ते प्रकाशित करण्यात आले.









## 'वाचन प्रेरणा दिन' डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम जयंती

मिसाईल मॅन डॉ. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्र माच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिगांबर कापसे होते, तर प्रमुख वक्ते म्हणून डॉ. धनंजय गभने यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. डॉ. गभने यांनी आपल्या भाषणात वाचनाचे महत्त्व अधोरेखित करत विद्यार्थ्यांनी वर्षभरात किमान ह्व नव्या पुस्तकांचे वाचन करावे असा संकल्प करण्याचे आवाहन केले. तसेच, अध्यक्षीय भाषणात डॉ. कापसे यांनी डॉ. अब्दुल कलाम यांच्या प्रेरणादायी जीवनावर प्रकाश टाकला. त्यांनी विद्यार्थ्यांना डॉ. कलाम यांच्या आदर्श विचारसरणीचे पालन करण्याचे आवाहन केले.

या निमित्ताने महाविद्यालयात संस्कृत सुभाषित आणि मनाचे श्लोक स्पर्धा आयोजित करण्यात आल्या. कार्यक्रमाचे संचालन आणि प्रास्ताविक डॉ सुनील देशमुख यांनी केले तर आभार प्रा. अजिंक्य भांडारकर यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी डॉ सुनंदा देशपांडे, डॉ. सुरेश बंसपाल, डॉ संगीता हाडगे, प्रा. धनंजय गिरेपुंजे, प्रा. लालचंद मेश्राम, प्रा. बाळकृष्ण रामटेके, डॉ. बंडू चौधरी, प्रा. रामभाऊ कोटांगले, डॉ. संदीप कुमार सरय्या, प्रा. मिलिंद कांबळे, प्रा. युवराज जांभुळकर, प्रा. कैवल्य गभणे, विनोद रामटेके, डॉ स्मिता गजभिये, प्रा प्रतिभा वंजारी, प्रा. रूपाली खेडीकर, प्रा. एकता जाधव, प्रा. मनीषा मदनकर, प्रा. शितल कोमेजवार, नंदकुमार सावरकर, प्रा. नेहा वंजारी आणि मनीषा अतकरी यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाला विद्यार्थी व प्राध्यापकवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते, आणि वाचनाच्या महत्त्वाची प्रेरणा सर्वांनी आत्मसात केली.









## विद्यार्थीभिमुख योजना कार्यशाळा

जोपर्यंत विद्यार्थी स्वत: योजनाबद्दल जागरूक राहणार नाही तोपर्यंत त्याला योजनांचा लाभ घेता येणार नाही. विद्यार्थ्यांनी योजनेचा लाभ घेऊन आपले कौशल्य जास्तीत जास्त प्रमाणात विकसित करावे व शैक्षणिक प्रगती करण्यासाठी कार्यतत्पर रहावे, असे मत प्राचार्य डॉ. दिगांबर कापसे यांनी व्यक्त केले. समर्थ महाविद्यालय लाखनी येथे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाच्या आदेशाने विद्यार्थ्यांच्या विद्यापीठातील विविध कल्याणकारी योजनांवर मार्गदर्शनपर कार्यशाळेचे आयोजन १९ ऑक्टोंबर २०२४ ला करण्यात आले होते.

कार्यशाळेला रा. तू. म. नागपूर विद्यापीठ नागपूरचे संचालक डॉ. विजय खंडाळ, सिनेट सदस्य मनीष वंजारी उपस्थित होते. प्रमुख मार्गदर्शक डॉ. विजय खंडाल यांनी, विद्यार्थी विकास विभाग जीवनाच्या सर्व क्षेत्रात विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास करण्यासाठी सतत कार्यरत असतो. विद्यार्थ्यांमध्ये असलेल्या सुप्त कलागुणांना व्यासपीठ मिळण्याकरिता विविध विद्यार्थीभिमुख कार्यक्रम या विभागाद्वारे राबवले जातात. तसेच विद्यार्थी केंद्रित योजनांचा विद्यार्थ्यांना कसा लाभ घेता येईल, विविध कल्याणकारी योजनांची सविस्तर माहिती त्यांनी आपल्या मार्गदर्शनातून विद्यार्थ्यांना दिली. सिनेट सदस्य मनीष वंजारी यांनी 'ग्रामीण भागातील विद्यार्थी योजनांपासून कसा उपेक्षित राहतो, विद्यार्थ्यांनी येणाऱ्या अडचणींवर मात करून आपला सर्वांगिण विकास साध्य करावा, असे प्रेरणादायी मार्गदर्शन केले. कार्यशाळेला जवळपास १५ महाविद्यालयाचे विभाग प्रमुख व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते. संचालन अर्थशास्त्र विभागाचे प्रा. युवराज जांभुळकर यांनी केले. प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय विद्यार्थी विकास विभागाच्या जिल्हा संयोजिका प्रा. डॉ. संगीता हाडगे, तर आभार ग्रंथालय विभाग प्रमुख प्रा. डॉ. धनंजय गभने यांनी मानले.



## विद्यार्थीभिमुख योजना कार्यशाळा











## लक्ष्मीपूजन सोहळा साजरा

महाविद्यालयात प्राचार्य डॉ.दिगांबर कापसे यांच्या अध्यक्षतेखाली लक्ष्मीपूजन कार्यक्रमाचे आयोजन दि.०१/११/२०२४ रोजी करण्यात आले. यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.
















## चला प्रदूषणमुक्त दिवाळी साजरी करुया !

समर्थ महाविद्यालय, लाखनी येथे दरवर्षी दिवाळी प्रदूषणमुक्त व्हावी या उद्‌देशाने महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.दिगांबर कापसे यांच्या संकल्पनेतून दि.३१/१०/२०२४ रोजी विद्यार्थी, प्राध्यापक व शिक्षक–शिक्षकेत्तर कर्मचारी यांना फटाके न फोडण्याबाबत शपथ दिली गेली.





## 'क्रीडा स्पर्धेत यश' यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ अंतर्गत

१४ विद्यार्थ्यांची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड

समर्थ महाविद्यालय, लाखनीच्या विद्यार्थ्यांनी आपल्या क्रीडाक्षेत्रातील कौशल्याचे उत्कृष्ट प्रदर्शन करत १४ विद्यार्थ्यांची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड करून उल्लेखनीय यश संपादन केले आहे. विविध क्रीडा प्रकारांमध्ये त्यांनी आपले वर्चस्व सिद्ध केले असून, त्यांच्या या यशामुळे महाविद्यालयाचा गौरव वाढला आहेविजेते खेळाडू यात सुचित बाबरे: १०० मीटर धावणे (प्रथम), लांब उडी (प्रथम), रिले (प्रथम), दिव्या लांजेवार: कबड्डी (निवड), २०० मीटर धावणे (द्वितीय) शीतल येळणे: कबड्डी (निवड), थाळीफेक (प्रथम), युवराज हटनागर: गोळा फेक (प्रथम), धवल गायधनी: व्हॉलीबॉल (प्रथम), अंजली हजारे: २०० मीटर (प्रथम), प्रज्वल मस्के: २०० मीटर (प्रथम), रिले (प्रथम), परेश येळेकर: चेस (प्रथम), धम्मदीप कोचे: चेस (द्वितीय), जानवी अतकरी: २०० मीटर (प्रथम), कबड्डी (निवड), रिले (प्रथम), मानसी मांढरे: गोळा फेक (प्रथम), मनीष उईके: त्रीपल जंप (प्रथम),

विजेते खेळाडू यात सुचित बाबरे: १०० मीटर धावणे (प्रथम), लांब उडी (प्रथम), रिले (प्रथम), दिव्या लांजेवार: कबड्डी (निवड), २०० मीटर धावणे (द्वितीय) शीतल येळणे: कबड्डी (निवड), थाळीफेक (प्रथम), युवराज हटनागर: गोळा फेक (प्रथम), धवल गायधनी: व्हॉलीबॉल (प्रथम), अंजली हजारे: २०० मीटर (प्रथम), प्रज्वल मस्के: २०० मीटर (प्रथम), रिले (प्रथम), परेश येळेकर: चेस (प्रथम), धम्मदीप कोचे: चेस (द्वितीय), जानवी अतकरी: २०० मीटर (प्रथम), कबड्डी (निवड), रिले (प्रथम), मानसी मांढरे: गोळा फेक (प्रथम), मनीष उईके: त्रीपल जंप (प्रथम) कल्याणी हटनागर: कबड्डीसाठी निवड झाली. या सर्व विजेत्यांनी यशाच्या उच्च शिखरावर पोहोचत राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेत आपले स्थान निश्चित केले आहे. येत्या १५ ऑक्टोबरला नाशिक येथे होणाऱ्या या स्पर्धेत हे विद्यार्थी सहभागी होणार असून, त्यांनी या स्पर्धेत महाविद्यालयाचे नाव उज्ज्वल करण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.






## 'क्रीडा स्पर्धेत यश' यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ अंतर्गत

.

या विजयाच्या निमित्ताने महाविद्यालयात उत्साहाचे वातावरण पसरले असून, विजेत्या विद्यार्थ्यांचा सन्मान सोहळा उत्साहात पार पडला. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नागपूर विभागाचे संचालक डॉ. नारायण मेहेरे आणि तायवाडे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शरयू तायवाडे यांच्या हस्ते खेळाडूंना प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला. यावेळी उपस्थित महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिगांबर कापसे, अभ्यास केंद्राचे संयोजक प्रा. अजिंक्य भांडारकर, मोहन कावळे, राजेश बांडेबुचे, रितेश झलके, जगदीश मोटघरे यांनी विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांच्या या यशामुळे महाविद्यालयाचे नाव क्रीडा क्षेत्रात अग्रगण्य ठरले आहे, आणि राज्यस्तरीय स्पर्धेतही हे विद्यार्थी आपले स्थान पक्के करून आणखी मोठे यश मिळवतील, अशी आशा व्यक्त करण्यात येत आहे.









## ६ डिसेंबर महापरिनिर्वाण दिन

### डॉ. बाबासाहेब आबेडकर हे विश्वकल्याणाचे जगद्गुरु — प्राचार्य दिगांबर कापसे

दि ६ डिसेंबर रोजी भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन सांस्कृतिक, राष्ट्रीय सेवा योजना व राष्ट्रीय छात्र सेना विभागाद्वारे करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ दिगांबर कापसे, प्रमुख वक्ते प्रा लालचंद मेश्राम व प्रमुख अतिथी म्हणून डॉ सुरेश बंसपाल, प्रा अशोक गायधनी, सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ संगीता हाडगे मंचावर उपस्थित होते. जगात मानवी मूल्ये रुजवण्याची काम अनेक थोर व्यक्तींनी केले आहे परंतु मानवाला सर्वात प्रिय असलेले स्वातंर्त्य मिळवून देण्याचा प्रामाणिक प्रयत्न डॉ. बाबासाहेबांनी केलेला आहे जगातील मानवाचे कल्याण व्हावे त्याकरिता त्यांना मूलभूत अधिकार मिळावे यासाठी जीवनभर झटणारे डॉ. बाबासाहेब एकमेव द्वितीय व्यक्ती होत त्यांच्या कार्यामुळे भारतीयांना मूलभूत कर्तव्य प्राप्त झालीच परंतु जगातील सर्व मानवांना त्याचा लाभ मिळाला म्हणून डॉ. बाबासाहेब हे खरूया अर्थाने विश्व मानव कल्याणाचे विश्वगुरू ठरतात असे मत डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन प्रसंगी समर्थ महाविद्यालयाचे प्राचार्य दिगांबर कापसे यांनी व्यक्त केले. यावेळी प्रा लालचंद मेश्राम यांनी आपल्या मनोगतात डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर प्रकाश टाकला तर आपले विद्यार्थी आपले वक्ते या कार्यक्रमांतर्गत पूजा कान्हेकर, राजश्री टेंभुर्णे, गरदिपसिंग गिल, ईशांत अतकर, रुजुलस्था गजभिये, आकांक्षा नागदेवे, मोनाली पडोळे, सृष्टी मेश्राम, सांची रामटेके, पूजा आगाशे या विद्यार्थीनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर आपले मनोगत मांडले. कार्यक्रमाचे संचालन प्रा प्रेरणा चाचेरे, प्रास्ताविक प्रा. मिलिंद कांबळे व आभार प्रा शीतल कोमेजवार यांनी मानले.






# ६ डिसेंबर महापरिनिर्वाण दिन


















## क्रीडा स्पर्धेत नैपुण्य

महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या योजनांसाठी विविध उपक्रम घेतली जातात. त्यापैकीच दिनांक १९ ऑक्टोबर २०२४ रोजी विद्यापीठ स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येत असलेल्या योजना विद्यार्थ्यांना माहीत व्हाव्या या उद्देशाने समर्थ महाविद्यालय लाखनी येथे सदर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.





## जिल्हास्तरीय कथा लेखन स्पर्धेत प्रथम पारितोषिक

महाविद्यालयातील बीए प्रथम वर्ष विद्यार्थी गरदीप सिंग गिल याने नेहरू युवा केंद्र जिल्हा भंडारा अंतर्गत आयोजित कथालेखन स्पर्धेत प्रथम पारितोषिक प्राप्त केल्याबद्दल महाविद्यालयातील प्राचार्य डॉ दिगांबर कापसे यांच्या हस्ते ८ डिसेंबर २०२४ ला सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आले. याप्रसंगी मराठी विभागप्रमुख बंडू चौधरी, प्रा अजिंक्य भांडारकर, मंगेश शिवरकर, श्यामराव पंचवटे उपस्थित होते.



## भारतीय भाषा दिन

महाविद्यालयात दिनांक ११ डिसेंबर २०२४ रोजी भारतीय भाषा दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी संस्कृत विभागातील प्रा रूपाली खेडीकर यांनी विद्यार्थ्यांना भारतीय भाषा दिनाबद्दल मार्गदर्शन केले. याप्रसंगी बहुसंख्येने विद्यार्थी उपस्थित होते यासोबतच प्रा. स्वाती नवले, प्रा. राखी बावनकुळे उपस्थित होते.






## एन.सी.सी. छात्रसैनिकांना शुभेच्छा !

एन.सी.सी. छात्रसैनिक सावनेर येथे पंधरा दिवसीय कॅम्पला जात असतांना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.दिगांबर कापसे यांनी छात्रसैनिकांना पहाटे बसस्टॉपवर दि.२१ डिसेंबर २०२४ रोजी शुभेच्छा दिल्या.



## स्वसंरक्षण कार्यक्रम

स्वसंरक्षणासाठी सतर्कता आणि संयम महत्त्वाचा आहे. विद्यार्थ्यांना मोबाईल व व्यसनांपासून दूर राहून अभ्यासाकडे लक्ष केंद्रित करण्याचा सल्ला पोलिस निरीक्षक हृदयनारायण यादव यांनी दिला. समर्थ महाविद्यालय लाखनी येथील मुलींच्या सुरक्षिततेसाठी स्वसंरक्षण प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन १४ डिसेंबर २०२४ महाविद्यालयाच्या भगिनी निवेदिता सभागृहात केले होते. यावेळी ते उद्घाटक म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.दिगांबर कापसे व प्रशिक्षक ज्ञानेश्वर गिऱ्हेपुंजे होते. त्यांनी विद्यार्थ्यांना स्वसंरक्षणाचे महत्त्व पटवून देत प्रात्यक्षिकांचे सादरीकरण केले. प्राचार्य डॉ.दिगांबर कापसे यांनी विद्यार्थ्यांना स्वसंरक्षण प्रशिक्षणाचा नियमित लाभ घेण्याचे आवाहन केले. कार्यक्रमात प्रा.धनंजय गिऱ्हेपुंजे, डॉ.सुनंदा देशपांडे, डॉ.संगीता हाडगे, प्रा.बाळकृष्ण रामटेके, सुरेश बंसपाल, लालचंद मेश्राम, संदीप सरेय्या, धनंजय गभने, बंडू चौधरी, अजिंक्य भांडारकर, मिलिंद कांबळे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाद्वारे विद्यार्थ्यांना त्यांच्या सुरक्षेबाबत जागरूक करीत आत्मसंरक्षणाचे कौशल्य आत्मसात करण्याची प्रेरणा देण्यात आली. महाविद्यालयात अशा उपक्रमांचे सातत्याने आयोजन होणार असल्याने विद्यार्थिनींना मोठा लाभ होणार आहे. प्रास्ताविक डॉ. सुनंदा देशपांडे यांनी केले. संचालन प्रा. स्वाती नवले यांनी तर डॉ. संगीता हाडगे यांनी आभार मानले.










## कमवा व शिका कार्यक्रम

### 'कमवा आणि शिका' उपक्रम करीअरला प्रोत्साहन देणारी संधी : प्राचार्य डॉ. दिगांबर कापसे

'कमवा आणि शिका' उपक्रम विद्यार्थ्यांना वेळेचे व्यवस्थापन, परिश्रम, सातत्य आणि जबाबदारीचे महत्त्व शिकवतो. या माध्यमातून व्यक्तिमत्त्वाचा विकास होतो तसेच सामाजिक आणि राष्ट्रीय हितासाठी विद्यार्थी योगदान देऊ शकतात. हा उपक्रम विद्यार्थ्यांना करीअरच्या दिशेने प्रोत्साहन देणारी संधी असल्याचे मत प्राचार्य डॉ. दिगांबर कापसे यांनी व्यक्त केले. ते येथील समर्थ महाविद्यालयात विद्यार्थी विकास विभागाच्या वतीने आयोजित 'कमवा आणि शिका' उपक्रमाच्या शुभारंभप्रसंगी बोलत होते. विद्यार्थी विकास विभागाच्या वतीने 'कमवा आणि शिका' उपक्रमाचा शुभारंभ १५ डिसेंबरला २०२४ रोजी करण्यात आला. उपक्रम घह्व मार्चपर्यंत राबविला जाणार आहे. या उपक्रमांतर्गत नागपूर विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाने निवडलेल्या विद्यार्थ्यांना महाविद्यालय स्तरावर विविध कामांचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. प्राचार्य कापसे यांनी, विद्यार्थी विकास विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध कार्यक्रमांमुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या प्रतिभेला वाव मिळतो आणि जीवनाच्या सर्व क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी पोषक वातावरण मिळत असल्याचे सांगितले. यावेळी निवड झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये विनय रोकडे, गर्दीपसिंग गिल, तोसीफ खान, पूजा कान्हेकर, हिना उरकुडे, आदिती गिरेपुंजे, स्वीटी हरडे, प्रज्ञा दिघोरे, अश्विनी सोनवणे, मानसी गिरीपुंजे, दिव्या निकोसे, आकांक्षा नागदेवे, श्रद्धा उके, स्नेहा रहांगडाले आणि संजना डोमळे यांचा समावेश आहे. कामाचे परीक्षण डॉ. सुनंदा रामटेके, डॉ. संगीता हाडगे, डॉ. सुरेश बंसपाल, डॉ. स्मिता गजभिये, प्रा. अजिंक्य भांडारकर आणि मालन सरोते यांनी केले. त्यांनी विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी प्रोत्साहन व शुभेच्छा दिल्या. विद्यार्थी विकास विभागाच्या यशस्वी आयोजनामुळे हा उपक्रम विद्यार्थ्यांना नवीन दृष्टी देणारा ठरला आहे.



## बी.एस्सी. प्रथम वर्ष नवविद्यार्थ्यांचा स्वागत कार्यक्रम




## डॉ. अजय चिकटे यांनी महाविद्यालयाला भेट

मराठी प्राध्यापक परिषदेचे ३५ वे अधिवेशन समर्थ महाविद्यालय लाखनी येथे नियोजित असून अधिवेशनाचे अध्यक्ष डॉ.अजय चिकटे यांनी महाविद्यालयाला दि.२८ डिसेंबर २०२४ ला भेट दिली. याप्रसंगी त्यांनी शिक्षणमहर्षी बापूसाहेब लाखनीकर यांच्या मुर्तीचे पूजन केले. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिगांबर कापसे यांनी त्यांचे शाल श्रीफळ देऊन सत्कार केले. याप्रसंगी मराठी विभागप्रमुख डॉ.बंडू चौधरी, डॉ.धनंजय गभने, प्रा.डॉ. धनंजय गिरीपुंजे आणि सर्व महाविद्यालयातील प्राध्यापक वृंद उपस्थित होते.






## गंगोत्री पिरॅमिडला भेट

समर्थ महाविद्यालय लाखनी येथील प्राचार्य डॉ.दिगांबर कापसे यांच्या मार्गदर्शनाखाली संस्कृत विभागात कार्यरत असलेल्या प्रा.रूपाली खेडीकर यांच्या नेतृत्वाखाली संस्कृत विषय असणाऱ्या विद्यार्थ्यांची क्षेत्रभेट पोहरा येतील योगप्रशिक्षक डॉ नरेशजी चारमोडे यांच्या गंगोत्री पिरॅमिड ला देण्यात आली. डॉ. चारमोडे यांनी विद्यार्थ्यांना योग, अष्टांग योग, ध्यान साधना प्राणायम, सूर्यनमस्कार इत्यादी योग विषयक माहिती दिली व प्रात्यक्षिक करून दाखवून विद्यार्थ्यांकडून ते करून घेतले. डॉ.चारमोडे यांनी योगाचे महत्त्व प्रतिपादित करून वेगवेगळया रोगावर करण्यात येणारे योग याचेही मार्गदर्शन त्यांनी केले. 'योग:कर्मसु कौशलम्' याचा अनुभव या क्षेत्रभेटीतंर्गत विद्यार्थ्यांला झाला. योगाचे प्रकार, त्याचे फायदे व योगाचा आपल्या सुदृढ शरीरयष्टीसाठी होणारा उपयोग याविषयी सखोल व विस्तृत माहिती विद्यार्थ्यांना या क्षेत्रभेटीतंर्गत झाली.












## संस्कृत सुभाषित पोस्टर स्पर्धा

समर्थ महाविद्यालय येथील प्राचार्य डॉ. दिगांबर कापसे यांच्या मार्गदर्शनाखाली संस्कृत विषयातील विद्यार्थ्यांची संस्कृत सुभाषित पोस्टर स्पर्धा २८/१०/२०२४ रोज सोमवारला घेण्यात आली. सुभाषित म्हणजे चांगले भाष्य करणे चांगले बोलणे व त्यानुसार वर्तन करणे. सुभाषित मानवाला नवीन जीवन जगण्याची कला शिकवतात. सुभाषितांमुळे आपल्याला आपल्या जीवनात अनेक चांगले वळण लावता येते व सुयोग्य जीवन घडवता येते असे प्रतिपादन या स्पर्धेचे परीक्षण करणाऱ्या वाणिज्य विभाग प्रमुख प्राध्यापिका डॉ. सुनंदा रामटेके यांनी विद्यार्थ्यांना केले. या स्पर्धेचा मुख्य उद्देश म्हणजे सुभाषित पाठांतर करून स्मरणशक्ती व आकलन शक्ती वाढवणे व विविध विषयावर आधारित असलेले सुभाषित समजून घेऊन त्यात सांगितलेले महत्त्व जीवनात उतरवणे व जीवनाला योग्य वळण देणे हा होता. या स्पर्धेत प्रथम क्रमांक बी.ए. द्वितीय वर्षाची विद्यार्थिनी कु. प्रज्ञा दिघोरी,द्वितीय क्रमांक बी.ए. तृतीय वर्षाची विद्यार्थिनी कु.शिवानी पचारे व तृतीय क्रमांक बी.ए. प्रथम वर्षाची विद्यार्थिनी कु. रिया मोटघरे या विद्यार्थिनींचा आला.









## महाज्योती अंतर्गत विद्यार्थ्यांना कौशल्य प्रशिक्षण









## संविधान प्रास्ताविकेचे वाचन

२६ नोव्हेंबर २०२४ रोजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.दिगांबर कापसे यांच्या अध्यक्षतेखाली संविधान प्रास्ताविकेचे वाचन करण्यात आले. या प्रसंगी महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षक आणि कर्मचारी वृंद उपस्थित होते.










## 'व्यवस्थापन' विषयावर गट चर्चा

समर्थ महाविद्यालयाच्या वाणिज्य विभागातर्फे बी.कॉम. प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी 'व्यवस्थापन' या विषयावर दिनांक ९ ऑक्टोबर २०२४ रोजी गट चर्चेचे आयोजन करण्यात आले होते. या चर्चासत्रात बी.कॉम. प्रथम वर्षातील १०विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग नोंदवला. विद्यार्थ्यांनी व्यवस्थापनाच्या विविध पैलूंवर आपली मते मांडली व विचारांची देवाणघेवाण केली. या गट चर्चेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिगांबर कापसे यांच्या मार्गदर्शनाखाली वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. सुनंदा देशपांडे, डॉ. संगीता हाडगे आणि डॉ. सुरेश बन्सपाल यांनी विद्यार्थ्यांना विषयाशी संबंधित महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले.




## विद्यार्थ्यांकडून पॉवर पॉईंट सादरीकरण

वणिज्य विभागातर्फे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. याच अनुषंगाने बी.कॉम. तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी दिनांक १८ ऑक्टोबर २०२४ रोजी पॉवर पॉइंट प्रेझेंटेशन सादर केले. या सादरीकरणाद्वारे विद्यार्थ्यांनी व्यावसायिक कौशल्ये, संकल्पना स्पष्टता आणि सादरीकरण क्षमता यांचा उत्कृष्ट परिचय दिला. या उपक्रमांचे आयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिगांबर कापसे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. तसेच वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. सुनंदा देशपांडे, डॉ. संगीता हाडगे आणि डॉ. सुरेश बन्सपाल यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन करून प्रोत्साहन दिले.



## 'देहबोली' या विषयावर विद्यार्थ्यांशी संवाद

वाणिज्य विभागातर्फे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी सातत्याने विविध उपक्रम राबविले जात आहेत. या उपक्रमांपैकी एक महत्त्वपूर्ण उपक्रम ''विद्यार्थ्यांशी संवाद'' या शीर्षकांतर्गत दि. २१ सप्टेंबर २०२४ रोजी आयोजित करण्यात आला होता. यावेळी ''देहबोली'' या विषयावर विद्यार्थ्यांशी सखोल संवाद साधण्यात आला. या कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिगांबर कापसे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. सुनंदा देशपांडे यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले.



## निबंध स्पर्धा : व्यक्तिमत्व विकास उपक्रम

वाणिज्य विभागातर्फे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी सातत्याने विविध उपक्रम राबविले जात आहेत. या उपक्रमांपैकी एक महत्त्वपूर्ण उपक्रम ''निबंध स्पर्धा'' आयोजित करण्यात आली होती. या निबंध स्पर्धेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिगांबर कापसे यांच्या मार्गदर्शनाखाली वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. सुनंदा देशपांडे यांनी या निबंध स्पर्धेचे आयोजन केले.



## गटचर्चा

विद्यार्थ्यांच्या बौद्धिक व संवाद कौशल्यांच्या विकासासाठी वाणिज्य विभागातर्फे अभ्यासक्रमावर आधारित गटचर्चा आयोजित करण्यात येतात. या उपक्रमाचे आयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिगांबर कापसे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.
वणिज्य विभाग प्रमुख डॉ. सुनंदा देशपांडे यांनी विद्यार्थ्यांना अभ्यासाशी संबंधित विविध विषयांवर गटचर्चा घेण्यासाठी प्रेरित केले असून, या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये विचारांची स्पष्टता, सादरीकरण कौशल्य आणि समूहामध्ये कार्य करण्याची क्षमता विकसित होत आहे.



## बॅंक ऑफ महाराष्ट्रला भेट

अर्थशास्त्र विभागाच्या वतीने क्षेत्रभेट अंतर्गत आज दिनांक १८/१०/२०२४ रोज शुक्रवारला महाराष्ट्र बँकेला भेट देण्यात आली. यामध्ये बँकेची कार्यप्रणाली कशी असते, बँकेमध्ये खाता उघडण्यासाठी आवश्यक असलेले कागदपत्रे कोणती, बँकेद्वारा कोणाला, किती आणि कोणत्या कार्यासाठी कर्ज दिले जाते. या विषयी सविस्तर माहिती बँकेचे शाखा व्यवस्थापक श्री. धनराज खवास यांनी दिली. सामाजिक कार्यासाठी झालेले बँकांचे राष्ट्रीयीकरण आणि सध्याच्या स्थितीमध्ये बँकांची जास्तीत जास्त नफा कमवण्याकडे होणारी वाटचाल आणि त्यामुळे बँकिंग व्यवस्थेत होणारे परिवर्तन त्या परिवर्तनाचा सर्वसामान्य व्यक्तीवर होणारा परिणाम याविषयी श्री.खवास यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सोबतच बँक खाते उघडण्याची प्रक्रिया आणि कर्ज घेण्यासाठी लागणाऱ्या आवश्यक कागदपत्राची माहिती श्री.धनराज खवास यांनी दिली. सर्वसामान्य माणसाच्या जिवाळ्याच्या विषय म्हणजे ई—केवायसी आणि ही ई —केवायसी करण्यासाठी लोकांना खूप दिवस का लागतात. याविषयी इतंभुत माहिती आमच्या विद्यार्थ्यांना या क्षेत्रीय भेटी मध्ये मिळाली. या क्षेत्रभेटीचे आयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिगांबर कापसे यांच्या मार्गदर्शनात व प्राध्यापक युवराज जांभुळकर यांच्या नेतृत्वात करण्यात आले. यावेळी अर्थशास्त्र विषयाचे प्राध्यापक कैवल्य गभणे, महाराष्ट्र बँकेचे कर्मचारी निरज गजभिये व बँकेचे इतर कर्मचारी उपस्थित होते.












## डॉ. मनमोहन सिंग यांना श्रद्धांजली

स्थानिक राष्ट्रीय शिक्षण संस्था लाखनी द्वारा संचालित समर्थ महाविद्यालय लाखनी येथे भारताचे १३ वे पंतप्रधान व माजी अर्थमंत्री डॉ. मनमोहन सिंग यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. ९० च्या दशकात दिवाळखोरीकडे गेलेल्या अर्थव्यवस्थेला सावरून देशाच्या नवीन उदार आर्थिक धोरणाची मुहूर्त मेळ रोवणारे द्रष्टे व्यक्तिमत्व डॉ.मनमोहन सिंग यांनी २६ डिसेंबर २०२४ ला जगाचा निरोप घेतला. प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ, देशाची माजी अर्थमंत्री, नियोजन आयोगाचे माजी उपाध्यक्ष, रिझर्व बँकेचे गव्हर्नर, अर्थशास्त्राचे प्राध्यापक, अर्थ मंत्रालयाचे मुख्य आर्थिक सल्लागार, इत्यादी पदे त्यांनी आपल्या जीवनामध्ये भूषवले. १९९१ ला भारताची आर्थिक स्थिती अत्यंत वाईट असताना देशातील सोना इंग्लंडला गहाण ठेवून देशाची नव्याने उभारणी करणारा व पीपीपी मध्ये देशाला जगातील तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था बनविणारा महान अर्थमंत्री व महान अर्थतज्ञ यांना महाविद्यालयातर्फे श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिगांबर कापसे अर्थशास्त्र विभागाचे प्राध्यापक युवराज जांभूळकर, प्रा. कैवल्य गभने व महाविद्यालयाचे इतर प्राध्यापक वृंद उपस्थित होते.



## पंकज कपडा मॉल लाखनीला शैक्षणिक भेट

समर्थ महाविद्यालय लाखनी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.दिगांबर कापसे यांच्या मार्गदर्शनाखाली एम.ए प्रथम वर्ष, प्रथम सत्र गृह अर्थशास्त्र विषयाच्या विद्यार्थिनींनी दिनांक ०४/१०/२०२४ रोज शुक्रवारला 'वस्त्र शास्त्र' या विषयाअंतर्गत पंकज कपडा मॉल लाखनी येथे शैक्षणिक भेट दिली.












## गृहनिवास बांधकाम साईटला भेट

बी.ए प्रथम वर्ष, प्रथम सत्र गृह अर्थशास्त्र विषयाच्या विद्यार्थिनींनी दिनांक ०४/१०/२०२४ रोज शुक्रवारला श्री.अनिल सोनवाने लाखनी यांच्या गृहनिवास बांधकाम साईटला भेट दिली.














## महिला उद्योजकता केंद्राचे उद्‌घाटन




समर्थ महाविद्यालय लाखनी गृहअर्थशास्त्र विभागाद्वारे महिला उद्योजकता केंद्राचे उद्‌घाटन दिनांक ११/१०/२०२४ रोज शुक्रवारला मा. प्राचार्य डॉ. दिगांबर कापसे तसेच वाणिज्यविभागाच्या डॉ.सुनंदा रामटेके, डॉ.संगीता हाडगे यांच्या हस्ते करण्यात आले.










# कौटुंबिक संसाधनाचे व्यवस्थापन– अंदाजपत्रक' गटचर्चा

गृह अर्थशास्त्र विभागाद्वारे बी.ए प्रथम वर्ष, प्रथम सत्र, गृह अर्थशास्त्र विषयाच्या विद्यार्थिनींनी 'कौटुंबिक संसाधनाचे व्यवस्थापन–अंदाजपत्रक' या घटकावर दिनांक ११/१२/२०२४ रोज गुरुवारला गटचर्चा केली.















## 'वस्त्र शास्त्र' या विषयाअंतर्गत सेमिनार

एम.ए प्रथम वर्ष, प्रथम सत्र गृह अर्थशास्त्र विषयाच्या विद्या विद्यार्थिनींनी दिनांक २४/१२/२०२४ रोज मंगळवारला 'वस्त्र शास्त्र' या विषयाअंतर्गत विविध घटकावर सेमिनारच्या माध्यमातून प्रकाश टाकला आणि वस्त्राविषयी नवीन दृष्टिकोनातून अभ्यास करता येतो असे उपस्थितांना पटवून दिले.















## 'गॅस सिलेंडर योग्य वापर आणि सुरक्षा जागरूकता'

दिनांक २१/१२/२०२४ रोज शनिवारला दास ग्रुप भंडारातर्फे 'गॅस सिलेंडर योग्य वापर आणि सुरक्षा जागरूकता' कार्यक्रम गृह अर्थशास्त्र विभागात करण्यात आला.






## 'खाद्यपदार्थ मेनू कार्ड' स्पर्धा

गृह अर्थशास्त्र विषयाअंतर्गत एम.ए तृतीय सेमिस्टरच्या विद्यार्थिनीं करिता पोषण आणि आहारशास्त्र या विषयाद्वारे 'खाद्यपदार्थ मेनू कार्ड' स्पर्धेचे आयोजन दिनांक २८/१२/२०२४ रोज शनिवारला गृहअर्थशास्त्र विभागात करण्यात आले.















## मॅथ क्लबची स्थापना

महाविद्यालयात गणित विभागाची स्थापना २०११–१२ रोजी झाली. दरवर्षी २१ डिसेंबर रोजी राष्ट्रीय गणित दिवस महाविद्यालयात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येतो. यावर्षी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिगांबर कापसे यांच्या अध्यक्षतेखाली आणि डॉ.सुरेश बन्सपाल, डॉ.भास्कर पर्वते, श्याम पंचवटे यांच्या प्रमुख उपस्थिती मॅथ क्लबची स्थापना करण्यात आली. प्रा. एकता जाधव यांनी श्रीनिवासन रामानुजन यांचा विषयी थोडक्यात माहिती दिली.  अध्यक्षस्थानी असलेले डॉ दिगांबर कापसे यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. तसेच कार्यक्रमच्या यशस्वीतेसाठी प्रा. नेहा हुकरे यांनी विशेष सहकार्य केले पोस्टर आणि रांगोळी स्पर्धेत उत्स्फूर्त प्रतिसाद मिडाले विद्यार्थ्यांच्या नवकल्पनेतुन विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पना साकार केले गणितीय सुमंचा आधार घेत रांगोळी रेखाटन करण्यात आले कार्यक्रम प्रसंगी प्रा.कोमेजवार, प्रा.मदनकर प्रा नवखरे, प्रा. संगीता हाडगे, प्रा.पोटभरे, प्रा गजभिये, प्रा. वंजारी, प्रा.स्वाती नवले, प्रा. रुपाली खेडीकर उपस्थित होते. तसेच गरदीपसिंग गिल, ट्विनकल चानोरे, राजश्री टेंभरे, रुकाय्या बकाली, महजबीन तुरक, दिव्या बांते, तृप्ती पारधी, प्रणाली वंजारी, संजना  बहिरे  चौतन्या तितीरमारे, देवश्री मस्के, धनश्री मस्के, माधवी वाघाये, ईशा मेश्राम, मानसी गिऱ्हेपुंजे, जान्हवी चेटूले, निधी खंडाईत, स्नेहल हटवार, रुजूलास्था, धनश्री वंजारी या विद्यार्थ्यांनी पोस्टर स्पर्धेत भाग घेतला. तसेच रांगोळी स्पर्धेत संजना बहिरे, तृप्ती पारधी, चैतन्या तितीरमारे प्रणाली वंजारी यांनी भाग घेतला. कार्यक्रमाचे संचालन राजश्री टेभरे  व आभार महजबीन तुरंक या विद्यार्थिनीने केले.



## जागतिक एड्स दिन कार्यक्रम

राष्ट्रीय छात्रसेना, राष्ट्रीय सेवा योजना , आजीवन अध्ययन व विस्तार विभाग, ग्रामीण रुग्णालय लाखनी व रेड रिबन क्लब यांच्या संयुक्त विद्यमानाने दिनांक ११ डिसेंबर २०२४ ला जागतिक एड्स दिन साजरा करण्यात आला या दिनानिमित्त ग्रामीण रुग्णालय लाखनी येथील समुपदेशक सीमा बावनकर प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होत्या. त्यांनी एचआयव्हीची लागण होण्याची कारणे व एचआयव्ही टाळण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय सांगितले. या कार्यक्रम प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.दिगांबर कापसे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. महाविद्यालयाचे ग्रंथपाल डॉ. धनंजय गभणे यांनी एनसीसी विद्यार्थ्यांना खुदको सुरक्षित रखना, सुरक्षित जीवन जगना अनिवार्य आहे असे मार्गदर्शन केले. प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. धनंजय गिऱ्हेपुंजे, प्रा.बाळकृष्ण रामटेके, ज्योत्स्ना शहारे, प्रतिमा सोनवाने, हर्षलालजी रामटेके, प्रा. लालचंद मेश्राम, डॉ. बंडू चौधरी, प्रा. अजिंक्य भांडारकर, प्रा.युवराज जांभुळकर मंचावर उपस्थित होते. एचआयव्ही प्रतिबंधाबाबत स्वयंसेवकांनी शपथ घेतली. यावर्षी जागतिक एड्स दिनाचे थीम टेक दी राइट्स पाथ ही आहे. १०९७ टोल फ्री क्रमांक व २०१७ च्या कायदा याविषयी विस्तृत माहिती देण्यात आली. कार्यक्रमाचे संचालन राजश्री टेंभरे, प्रास्ताविक व पाहुण्यांच्या परिचय कॅप्टन बाळकृष्ण रामटेके, आभार प्रदर्शन रुचिता गायधने हिने मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वी ते करिता सीनियर अंडर ऑफिसर गौरव कमाने, ज्युनियर अंडर ऑफिसर नोबेल घुसे, सार्जंट रोहिणी निखाडे, सी पी एल रितू आगाशे यांनी अथक परिश्रम घेतले.










## मतदान जनजागृती रॅली

समर्थ महाविद्यालय लाखनी, पतंजली योग समिती व तहसील कार्यालय लाखनी यांच्या संयुक्त विद्यमानाने मतदारांना मतदानाविषयी जागृत करण्यासाठी व १००% मतदान करण्यासाठी दिनांक १७ नोव्हेंबर २०२४ रोजी रविवारला भगिनी निवेदिता समर्थ महाविद्यालय लाखनी येथून सिंधी लाईन चौक, साई मंदिर मुरमाडी मतदार जनजागृती रॅली काढण्यात आली होती या रॅलीत सहभागी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिगांबर कापसे, एनसीसी विभाग प्रमुख कॅप्टन बाळकृष्ण रामटेके व एनसीसी कॅडेट सहभागी झालेले होते.









## सन्मान छात्रसैनिकांचा

३ महाराष्ट्र गर्ल्स बटालियन एनसीसी नागपुर द्वारा आयोजित CATC –६२१ कॅम्प सावनेर येथे रस्सीखेच स्पर्धेत प्रथम क्रमांक समर्थ महाविद्यालयातील एनसीसी कॅडेट्सने पटकाविल्याबद्दल गोल्ड मेडल देऊन सन्मानित करताना ३ महाराष्ट्र गर्ल्स बटालियन कमांडिंग ऑफिसर कर्नल राजीव भोला, ४ महाराष्ट्र बटालियन एनसीसी नागपूरचे कर्नल राजीव कपूर यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.






## अभिजात मराठी भाषा अभिमान सोहळा

महाविद्यालयात अभिजात मराठी भाषा अभिमान सोहळा शनिवार, २८ डिसेंबरला समर्थ महाविद्यालयात पार पडला. यावेळी प्रमुख वक्ते डॉ. प्रकाश मालगावे यांनी मराठी भाषेचा ऐतिहासिक प्रवास व अभिजात दर्जाचे महत्त्व पटवून दिले.

केंद्र सरकारने ३ऑक्टोबर २०२४ रोजी मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा बहाल केला. ऐतिहासिक निर्णयाचे स्वागत व प्रचार, प्रसार करण्याच्या हेतूने या सोहळ्याचे आयोजन केले होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. दिगांबर कापसे होते. त्यांनी केंद्र सरकारचे अभिनंदन करीत मराठी भाषेच्या संवर्धनासाठी सर्वांनी योगदान देण्याची गरज आहे, अशी भावना व्यक्त केली. व्यासपीठावर मराठी विभागप्रमुख डॉ. बंडू चौधरी, डॉ. धनंजय गिऱ्हेपुंजे, राजेश बांते व श्रावण कापगते उपस्थित होते. याप्रसंगी डॉ. प्रकाश मालगावे यांनी मराठी भाषेचा उगम दहाव्या शतकात झाला असून, ज्ञानेश्वरीसारख्या साहित्यकृतींनी मराठीला शिखरावर नेले. अभिजात दर्जा हा त्याचाच सन्मान असल्याचे सांगितले. डॉ. दिगांबर कापसे यांनी मराठी भाषा टिकवण्यासाठी साहित्य, शिक्षण संस्था व नागरिकांची सामूहिक जबाबदारी असल्याचे प्रतिपादन केले. कार्यक्रमाला डॉ. सुरेश बन्सपाल, डॉ. धनंजय गभने, डॉ. सुनंदा देशपांडे, डॉ. संदीप कुमार सरया, लालचंद मेश्राम, रामभाऊ कोटांगले, स्मीता गजभिये, एकता जाधव, रूपाली खेडीकर, शामराव पंचवटे, मंगेश शिवरकर आदी उपस्थित होते. प्रास्ताविक अंगेश बेहलपाडे यांनी केले. संचालन अजिंक्य भांडारकर यांनी केले.














## शिक्षणमहर्षी बापूसाहेब लाखनीकर यांची पुण्यतिथी कार्यक्रम

२६ डिसेंबर २०२४ रोजी शिक्षणमहर्षी बापूसाहेब लाखनीकर यांच्या पुण्यतिथी निमित महाविद्यालयात प्राचार्य डॉ.दिगांबर कापसे यांच्या अध्यक्षतेखाली मूर्ती पूजन करण्यात आले. या प्रसंगी महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षक आणि कर्मचारी वृंद उपस्थित होते.











## वेशभूषा





# दर्पण

## समर्थ महाविद्यालयात "अर्चना" वार्षिक अंकाचे थाटात प्रकाशन



## तरुण भारत

Purva Vidarbha | 2024-12-08 | Page-9

epaper.tarunbharat.net

### डॉ. आंबेडकर हे विश्वकल्याणाचे जगद्गुरु

प्राचार्य दिगांबर कापसे यांचे मत; समर्थ महाविद्यालयात महापरिनिर्वाण दिन



Powered by iDocuments

## नवराष्ट्र

www.navarashtra.com

परिसंवादाचे आयोजन ● अध्यक्षपदी प्राचार्य डॉ. अजय चिकाटे यांची एकमताने निवड

### लाखनीत मराठी प्राध्यापक परिषदेचे अधिवेशन



Bhandara Plus Edition
Dec 13, 2024 Page No. 2
Powered by: Navarashtra.com

## मराठी प्राध्यापक परिषदेच्या ३५ व्या अधिवेशनाचे अध्यक्षपदी प्राचार्य डॉ.अजय चिकाटे यांची निवड



## देशोन्नती



### डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे विश्वकल्याणाचे जगद्गुरू : प्रा. दिगांबर कापसे

Bhandara Edition
Dec 7, 2024 Page No. 6
Powered by: erelego.com

## तरुण भारत

Purva Vidarbha | 2024-10-16 | Page-9

epaper.tarunbharat.net



### समर्थ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची क्रीडा क्षेत्रात भरारी

Powered by iDocuments

## 'कमवा आणि शिका' करिअरसाठी प्रोत्साहन देणारा

प्राचार्य डॉ. दिगांबर कापसे; विविध कामाचे प्रशिक्षणाचे उद्घाटन



## समर्थ महाविद्यालय लाखनीच्या विद्यार्थ्यांची क्रीडा क्षेत्रात वर्चस्व



### 14 विद्यार्थ्यांची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड

## देशोन्नती

### महिला उद्योजकता केंद्राचे उद्घाटन

■ स्वतःबरोबर इतरांनाही रोजगाराच्या संधी



Bhandara Edition
Oct 17, 2024 Page No. 2
Powered by: erelego.com

## नवभारत

### समर्थ महाविद्यालय में मनाया वाचन प्रेरणा दिवस



Bhandara Plus Edition
Oct 16, 2024 Page No. 4
Powered by: navbharatlive.com

## सकाळ

### समर्थ महाविद्यालयात महिला उद्योजकता केंद्राचे उद्घाटन



## डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे विश्वकल्याणाचे जगद्गुरु - प्राचार्य दिगांबर कापसे



## अर्थशास्त्र विभागाची महाराष्ट्र बँकेला भेट



## देशोन्नती

### समर्थ महाविद्यालयात वाचन प्रेरणा दिन



Bhandara Edition
Oct 19, 2024 Page No. 3
Powered by: erelego.com

## नव प्रहार

### समर्थ महाविद्यालय लाखनीच्या विद्यार्थ्यांचे क्रीडा क्षेत्रात वर्चस्व

14 विद्यार्थ्यांची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड



# दर्पण

पुण्यनगरी

## समर्थ महाविद्यालयातर्फे २५ गावांत 'स्वच्छमेव जयते' अभियान आज

Bhandara / Gondia Edition
Oct 02, 2024 Page No. 01
Powered by: erelego.com

नव प्रहार

## समर्थ महाविद्यालय लाखनीतर्फे गांधी जयंती निमित्त 'स्वच्छमेव जयते' स्वच्छता अभियान

## समर्थ महाविद्यालयात 'अर्चना' वार्षिक अंकाचे थाटात प्रकाशन

## समर्थ महाविद्यालयात 'अर्चना' वार्षिक अंकाचे थाटात प्रकाशन

लोकशाही वार्ता

## समर्थ महाविद्यालयात जागतिक एड्स दिन कार्यक्रम

लोकमत

## समर्थ महाविद्यालयात राष्ट्रीय गणित दिवस

पुण्यनगरी

## समर्थ महाविद्यालयात राष्ट्रीय गणित दिवस

Bhandara / Gondia Edition
Dec 23, 2024 Page No. 01
Powered by: erelego.com

तरुण भारत

Purva Vidarbha | 2024-12-22 | Page-9

## 'कमवा आणि शिका' उपक्रम करीअरला प्रोत्साहन देणारी संधी : प्राचार्य डॉ. दिगांबर कापसे

## समर्थ महाविद्यालयात योगाभ्यास कार्यशाळा

सकाळ

## स्वसंरक्षणासाठी सावधानता व संयम महत्त्वाचा : पोलिस निरीक्षक यादव

### समर्थ महाविद्यालयात स्वसंरक्षण प्रशिक्षण

## समर्थ महाविद्यालया, लाखनी येथे राष्ट्रीय गणित दिवस साजरा

### विद्यार्थ्यांनी जीवनाचे गणित योग्य दिशेने करावे– प्राचार्य डॉ.दिगाबर कापसे

नव प्रहार

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे विश्वकल्याणाचे जगद्गुरु - प्राचार्य दिगांबर कापसे

पुण्यनगरी

## 'कमवा आणि शिका' उपक्रम विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देणारी संधी

Bhandara / Gondia Edition
Dec 21, 2024 Page No. 01
Powered by: erelego.com

नवराष्ट्र
www.navarashtra.com

## समर्थ महाविद्यालयात 'कमवा आणि शिका उपक्रम'

### 15 डिसेंबर ते 15 मार्चपर्यंत दिले जाणार विविध कामाचे प्रशिक्षण

Bhandara Plus Edition
Dec 21, 2024 Page No. 2
Powered by: Navarashtra.com

## समर्थ महाविद्यालयात राष्ट्रीय गणित दिवस साजरा

सकाळ

## 'कमवा आणि शिका' करिअरसाठी प्रोत्साहन देणारा

### प्राचार्य डॉ. दिगांबर कापसे; विविध कामाचे प्रशिक्षणाचे उद्‌घाटन

## समर्थ महाविद्यालय लाखनीतर्फे गांधी जयंती निमित्त 'स्वच्छमेव जयते' स्वच्छता अभियान

पुण्यनगरी

## लाखनीत मराठी प्राध्यापक परिषदेचे जानेवारीत अधिवेशन

Bhandara / Gondia Edition
Dec 13, 2024 Page No. 01
Powered by: erelego.com

तरुण भारत

Purva Vidarbha | 2024-12-19 | Page-9

## स्वसंरक्षणासाठी सावधानता, संयम महत्त्वाचा

### पोलिस निरीक्षक हृदयनारायण यादव यांचे मत

देशोन्नती

## अर्थशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांची महाराष्ट्र बँकेला भेट

देशोन्नती वृत्तसंकलन

लाखनी : स्थानिक राष्ट्रीय शिक्षण संस्था द्वारा संचालित समर्थ महाविद्यालय लाखनी येथील अर्थशास्त्र विभागाच्या वतीने क्षेत्रभेट अंतर्गत आज दि. १८ ऑक्टोबर २०२४ रोज शुक्रवारला महाराष्ट्र बँकेला भेट देण्यात आली. यामध्ये बँकेची कार्यप्रणाली कशी असते, बँकेमध्ये खाता उघडण्यासाठी आवश्यक असलेले कागदपत्रे कोणती, बँकेद्वारे कोणत्या, किती आणि कोणत्या कार्यासाठी कर्ज दिले जाते. याविषयी सविस्तर माहिती बँकेचे शाखा व्यवस्थापक धनराज खवास यांनी दिली. सामाजिक कार्यासाठी झालेले बँकांचे राष्ट्रीयीकरण आणि सध्याच्या स्थितीमध्ये बँकांची जास्तीत जास्त नफा कमवण्याकडे होणारी वाटचाल आणि त्यामुळे बँकिंग व्यवस्थेत होणारे परिवर्तन त्या परिवर्तनाचा सर्वसामान्य व्यक्तीवर होणारा परिणाम याविषयी खवास यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सोबतच बँक खाते उघडण्याची प्रक्रिया आणि कर्ज घेण्यासाठी लागणाऱ्या आवश्यक कागदपत्रांची माहिती खवास यांनी दिली. सर्वसामान्य माणसाच्या जिव्हाळ्याचा विषय म्हणजे ई-केवायसी आणि ही ई-केवायसी करण्यासाठी लोकांना खूप दिवस का लागतात. याविषयी इत्थंभूत माहिती आमच्या विद्यार्थ्यांना या क्षेत्रीय भेटीमध्ये मिळाली. या क्षेत्रभेटीचे आयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिगांबर कापसे यांच्या मार्गदर्शनात व प्राध्यापक युवराज जांभुळकर यांच्या नेतृत्वात करण्यात आले. यावेळी अर्थशास्त्र विषयाचे प्राध्यापक कैलाश गभणे, महाराष्ट्र बँकेचे स्थानिक नियुक्त व्यवस्थापक बँकेचे इतर कर्मचारी उपस्थित होते. (सा.प्र.)

लोकमत

## समर्थ महाविद्यालयात महिला उद्योजकता केंद्राचे उद्‌घाटन

उद्‌घाटन करताना प्राचार्य डॉ.दिगांबर कापसे उपस्थित डॉ.सुनंदा रामटेके व अन्य.

Hello Bhandara
Page No. 4 Oct 17, 2024
Powered by: erelego.com